क्रमांक कक्ष 4(2)/बेवारस वाहने/जाहिर लिलाव/2025, -3ce सोलापूर शहर, दिनांक 01/04/2025

विषय : पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे,पोलीस मुख्यालय व शहर वाहतूक शाखा येथील बेवारस वाहनांचा जाहिर लिलावाची जाहिरात कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीस देण्याबाबत..

000000000000000

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे/पोलीस मुख्यालय/शहर वाहतूक शाखा येथे जमा असलेले बेवारस वाहनांचा लिलाव दिनांक 08/04/2025 रोजी पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे ठेवण्यात आलेला आहे. त्या करीता इच्छूक व्यक्ती/फर्म यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावयाची सविस्तर जाहिरात (एकूण तीन पाने) सोबत जोडण्यात आलेली आहेत. तरी सदरची जाहिरात आजच दिनांक 01/04/2025 रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळावर बिनचुकपणे प्रसिध्दीस देण्यात यावी व पुर्तता अहवाल सादर करावा.

मा.पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने )

(रोहिदास चवरे)
प्रशासकीय अधिकारी,
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे करीता

प्रति,

पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, सोलापूर शहर

H.C. कुलकर्णी

01/04

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**
नवीन प्रशासकीय इमारत, गांधी नगर सोलापूर
**दुरध्वनी क्रमांक:- 0217-2744613**
EmailID cp.solapur@mahapolice.gov.in

-जा.क्र. कक्ष-४(२)/बेवारस वाहने/लिलाव/२०२५ -३८५ सोलापुर शहर, दि ७ /०४/२०२५

# जाहिरात

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हददीमध्ये विविध पोलीस ठाणे व शाखा येथे जमा असलेल्या वाहनांच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 85(1) प्रमाणे या कार्यालयाच्या संकेतस्थळावर व स्थानिक दोन वर्तमानपत्रांव्दारे दिनांक 17/12/2024 रोजी जाहिर प्रसिध्दी देण्यात येवून जमा असलेल्या वाहनांचा मालकी हक्क सिध्द करुन सदरची वाहने ताब्यात घेण्यासाठी 60 दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र सदर कालावधी उलटून गेल्यानंतरही अदयापर्यंन्त कोणीही मालकी हक्क सिध्द करण्यासाठी समोर आले नाही. त्या अनुषंगाने सदर जाहिरातीत नमूद एकूण 932 वाहने ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 87 अन्वये बेवारस म्हणून घोषित करण्यात येत असून सदरच्या वाहनांचा जाहिर लिलाव करण्यात येणार आहे.

**वाहनांचा तपशिल**

| अ.क. | लॉट क्रमांक | ठिकाण | वाहनांची संख्या | तपशिल | निरीक्षणासाठी संपर्क क्रमांक | किमान बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | A | पोस्टे फौजदार चावडी | 33 | टू व्हीलर-33 | 9923412140 | 12,52,589 |
| | | पोस्टे जेलरोड | 89 | टू व्हीलर-89 | 8668600750 | |
| | | पोस्टे एमआयडीसी | 53 | टू व्हीलर-50<br>ट्रक/टॅम्पो/कार-2<br>रिक्षा-1 | 9922537891 | |
| | | पोस्टे जोडभावी | 42 | टू व्हीलर -42 | 9923483551 | |
| | | पोस्टे सदर बजार | 52 | टू व्हीलर-52 | 9767895790 | |
| | | पोस्टे विजापूर नाका | 03 | टू व्हीलर -3 | 9823844977 | |
| | | पोस्टे सलगर वस्ती | 38 | टू व्हीलर-34, ट्रक/टॅम्पो/कार-3<br>रिक्षा-1 | 9545091762 | |
| | | पोलीस मुख्यालय | 153 | टू व्हीलर-152, ट्रक-1 | 9834234526 | |
| 02 | B | शहर वाहतूक शाखा | 469 | टू व्हीलर-217,<br>ट्रक/टॅम्पो/कार-19<br>रिक्षा-233 | 9765900100 | 32,72,006 |

## लिलावाचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 01 | निरीक्षण कालावधी | दिनांक 03/04/2025 ते 07/04/2025 | कार्यालयीन वेळेत (सकाळी 10.00 ते 18.00 वाजेपावेतो) संबंधीत ठिकाणी |
| 02 | लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी नोंदणी | दिनांक 08/04/2025 | सकाळी 10.30 ते 11.30 वाजेपर्यंन्त पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे |
| 03 | लिलाव प्रक्रिया | दिनांक 08/04/2025 | सकाळी 11.30 पासून पुढे |

**अटी व शर्ती**

1. लिलाव प्रक्रिया ही दिनांक 08/04/2025 रोजी सकाळी 11.30 वाजेपासून परेड मैदान,पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर या ठिकाणी राबविण्यात येईल.
2. लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी इच्छूक व्यक्ती निरीक्षण कालावधीमध्ये लॉट निहाय वरील नमूद ठिकाणी भेट देवून लिलावासाठी उपलब्ध असलेल्या वाहनांचे निरीक्षण करु शकतात. त्यासाठी उपरोक्त नमूद संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.
3. लिलाव प्रक्रिया ही उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे लॉट निहाय राबविण्यात येणार आहे.
4. लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणा-या व्यक्तींनी सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत लिलावाच्या ठिकाणी संबंधीत अधिका-यांकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी स्वत:चे/फर्मचे आधार कार्ड, पॅन कार्ड, आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नंबर डिटेल्स, दोन फोटो इत्यादी कागदपत्रे सोबत आणावित.
5. नोंदणी करतेवेळी PA to CP Solapur या नांवे रुपये 50,000/- रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राप-ट जमा करणे आवश्यक आहे.
6. नोंदणी केलेल्या व्यक्तींनाच बोली लावण्याची परवानगी दिली जाईल. या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना लिलाव परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.
7. लिलाव हा आवाजी पध्दतीने घेण्यात येईल.
8. लिलावामध्ये इच्छूक व्यक्ती एक किंवा अधिक लॉटसाठी बोली लावू शकतात.
9. लिलाव प्रक्रियेमध्ये उच्चतम बोली लावणा-या व्यक्तीने/फर्मने बोलीच्या 50 % रक्कम 02 दिवसांत, तर उर्वरीत 50 % रक्कम लिलावापासून जास्तीत जास्त 05 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. (बोली रक्कम +1 % टीडीएस )

10 सर्व रक्कम जमा झालेनंतर वाहने उचलण्याची परवानगी दिली जाईल.

11 कोणत्याही परिस्थितीमध्ये लिलावापासून 15 दिवसांच्या आत सर्व वाहने उचलणे बंधनकारक आहे.

12 लिलावामध्ये उच्चतम बोली लावणा-या व्यक्तीने पुढील 02 दिवसांत 50 % रक्कम जमा न केल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करुन सदर लॉटचा लिलाव रदद करुन फेर लिलाव घेण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

13 सदर लिलावातील सर्व वाहने ही पुर्णपणे भंगार करुन विक्रि करण्यासाठी देण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनार्थ सदरचे वाहन/त्याचे भाग वापरता येणार नाहीत. या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र संबंधीतास नोटरी करुन दयावे लागेल.

14 कोणतेही कारण न देता जाहिर लिलाव रदद करणे अथवा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार लिलाव कमिटी, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

(अजित बो-हाडे)
पोलीस उपआयुक्त (मुख्या)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर करीता